# ऋ ण नि र्दे श

"सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या अभ्यासाची भुमिका उत्तर सोलापूर तालुक्याचा संदर्भ" या विषयावर संशोधन करण्यासाठी तालुक्यातील सरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी, राजकीय नेते व गावक-यांनी विषयाशी संबंधित तथ्य संकलनासाठी योग्य सहकार्य देऊन प्रश्नावली भरून दिली अशा सर्वांची कृतज्ञता व्यक्त करतो.

संशोधनाच्या शोध प्रबंधासाठी शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक विज्ञानशाखेचे डीन व राज्यशास्त्र विभाग प्रमुख व प्राध्यापक डॉ. के. के. कावळेकर हे मार्गदर्शक म्हणून लाभले. डॉ. के.के. कावळेकर सरांसारखे व्यासंगी अभ्यासक व राज्यनितीज्ञ मार्गदर्शक मिळाल्यामुळे मी सुदैवी आहे. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय हा शोधप्रबंध पूर्ण होऊ शकला नसता याची मला जाणीव आहे. त्यांनी सतत मार्गदर्शन करून अमूल्य सूचना देऊन संशोधनाच्या कार्याला मूर्त स्वरूप प्राप्त करून दिले. सरांची कृतज्ञता व्यक्त करणेसाठी माझ्याकडे शब्दच नाहीत. कोणत्या शब्दांत त्यांचे आभार मानावेत हेच सुचत नाही. त्यांच्या आभाराच्या दोन शब्दांनी ऋणाचा भार हालका करून घेण्यापेक्षा आयुष्यभर सरांच्या ऋणात राहणेच मी पसंत करतो.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. लक्ष्मीनारायण, डॉ. सौ. रासम, व्ही.पी., डॉ. चौसाळकर सर, डॉ नानीवडेकर, सौ. पाटील मॅडम, श्री. तोरस्कर, वालचंद महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी.ए. काहीकर यांनी वेळोवेळी शोध-

प्रबंधाच्या कार्याची आस्थापूर्वक चौकशी करून प्रोत्साहन देऊन माझ्यामध्ये धाडस निर्माण केले त्या सरांची कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य मानतो.

छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.टी. माने, प्राध्यापक मित्रांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

शोधप्रबंधाच्या कार्यात माझ्या कुटुंबातील सर्व व्यक्तींनी वेळोवेळी सहकार्य केले. त्याबद्दल त्यांचे ऋण मानने त्यांनार रूचणारे नसले तरी ऋण मानणे मी माझे कर्तव्य मानतो.

शोधप्रबंधाच्या कार्यात ज्ञात अज्ञात व्यक्तींचे सहकार्य लाभले अशा सर्वांचा मी ऋणी आहे.

प्रा. दत्तात्रय मुरलीधर फटे,
सोलापूर.

.....